# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५६५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जा.क्र.मजीप्रा/सस/तांत्रा-१/३५०/ 3003

दिनांक : ११.७.२०००

**परिपत्रक क्रमांक** ४६

**विषय :** अतिरिक्त बाबींच्या मंजुरीपूर्वी ७५ टक्के देयके अदा करणेबाबत..

१) अतिरिक्त बाबींच्या मंजुरीबाबत दिनांक ३.९.९९च्या परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यांत येत असेलच. तथापि अतिरिक्त बाबींना दरसूचीना सक्षम अधिका-यांनी मंजुरी देण्यापूर्वी अतिरिक्त बाबींच्या पोटी ७५ टक्के देयके अदा करण्यात येतात असे मुख्य अभियंता, पुणे यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले आहे. या अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली (M.P.W. Manual) मधील कलम क्रमांक २२८ मध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे की, कोणतीही अतिरिक्त बाब तोंडी सूचनांनुसार किंवा सक्षम अधिका-यांनी मान्यता देण्यापूर्वी कंत्राटदाराकडून करून घेण्यात येवू नये. त्यामुळे सक्षम अधिका-याच्या मान्यतेपूर्वी अतिरिक्त बाबीपोटी जिथे काम करण्यास मनाई आहे तिथे अतिरिक्त बाबीपोटी ७५ टक्के देयके अदा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अतिरिक्त बाबींच्या मंजुरीपूर्वी ७५ टक्के देयके अदा करण्याची पध्दत अवलंबण्यात येत असेल तर ते आक्षेपार्ह असल्याने अशी पध्दत त्वरित बंद करावी व अतिरिक्त बाबी सक्षम अधिका-यांनी किमान तात्विक मंजुरी दिल्यानंतरच कंत्राटदाराकडून अतिरिक्त बाबींपोटी काम करून घेण्यात यावे व अतिरिक्त बाबींना सक्षम अधिका-यांनी रितसर मंजुरी दिल्यानंतरच कंत्राटदाराने केलेल्या कामांची देयके अदा करण्यात येतील याची कटाक्षाने खबरदारी घ्यावी.

यापुढे अशी प्रकरणे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अशी मंजुरी आपल्या विभागात किती प्रकरणी देण्यात आली व देणा-याचे नाव, सर्व सविस्तर माहिती त्वरीत पाठवावी.

(स्वाक्षरी)
(राजेंद्र मगणे)
**सदस्य सचिव (तांत्रिक)**

**प्रत,**

मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व., मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी.
सचिव, पा.पु. व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी.
सदस्य सचिव (प्र.व वा.अ.स.), म.जी.प्रा., मुंबई यांचे माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. चा.विभाग, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

M. J. P.
ISSUED
15 JUL 2000
MUMBAI-21